**CNR No. MHRG040003362024**

## दिवाणी चौकशी अर्ज क्र. २०१/२०२४ मधील निशाणी ९ वरील आदेश

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जात दुरूस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, मुळ अर्जाचे परिच्छेद क्र. ८ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा नमुद भूमापन क्र. ५०, हिस्सा क्र.७ हा वाशीवलीमध्ये सदर मिळकत असतांना होता व सद्य परिस्थितीत ही मिळकत साईनगर, ता.खालापूर मध्ये समाविष्ट करण्यात आलेली असून त्याबाबत फेरफार क्र. १३४५ झाल्याने मुळ अर्जातील परिच्छेद क्र. ८ वगळुन परिच्छेद क्र. ८ अ व ब नमुद करण्याची परवानगी मिळावी. यापुढे त्यांनी प्रतिपादन केले की, परिच्छेद क्र. ३ मध्ये गट क्र. ५०/७ चे गाव बदलले असून गट क्र. १७/५ ची मिळकत अर्जात नमुद करावयाची राहून गेल्याची माहिती अर्जदारांना नव्हती व परिच्छेद क्र. ३ मध्ये ८ अ व ब हे नमुद करण्याची परवानगी मिळावी.

३. अभिलेखाचे अवलोकन करता व अर्जदारांचे वि.अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसून येते की, सदरहू अर्ज वारस दाखला मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरूस्ती केल्यास मुळ अर्जाच्या स्वरूपात कुठलाही बदल होत नाही. सदरहू अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

अर्जदारांना मुळ अर्जात प्रार्थित दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR

Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2025.02.20 17:46:58 +0530

पनवेल
दिनांक २०/०२/२०२५

(ए.एस. बडगुजर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल